# <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>

महाराष्ट्र शासनाने तात्पुरत्या स्वरूपात ट्रेनच्या चाचणी करीता व ट्रेन पार्क करण्यासाठी सुविधा निर्माण करण्यासाठी दिलेल्या परवानगीच्या अनुषंगाने माध्यमांद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशचे व्यवस्थापकीय संचालक श्री रणजीत सिंह देओल यांनी खालील प्रमाणे दिलेली आहेत.

**प्र- कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ च्या चाचणीस (Trial Run) कधी सुरुवात होणार?**

**उ-** मेट्रो-३ची पहिली आठ डब्याची ट्रेन यावर्षा अखेर मुंबईत दाखल होणार आहे. हे आठ डबे स्वतंत्रपणे मुंबईत आणले जातील व त्यांचे एकत्रीकरण केले जाईल. या प्रकियेला किमान दोन आठवड्याचा कालावधी लागेल आणि त्यानंतर पहिल्या ट्रेनच्या चाचणीस सुरुवात होईल.

**प्र- प्रस्तावित चाचण्या या कधी व कोठे होणार आहेत?**

**उ-** ह्या चाचण्या रॅम्पच्या मुखाशी होणार आहे व हा रॅम्प मरोळ-मरोशी मार्गाच्या पश्चिमेस जी जागा मार्ग अंडरपासमध्ये वळविल्यानंतर रिकामी झाली आहे तेथे आहे.

**प्र- मेट्रोसाठी किती ट्रेन्सची निर्मीती होणार आहे व अद्याप किती ट्रेन्स तयार आहेत?**

उ - एकूण आठ डब्याच्या 2 ट्रेन्स सध्या तयार असून तिसऱ्या ट्रेनची निर्मिती सुरू आहे.

**प्र- ट्रेन्ससाठी पर्यायी कारशेड कुठे असणार आहे आणि डब्याच्या पार्किंगची व्यवस्था कुठे असणार आहे?**

**उ-** सध्या नमुना गाडीच्या चाचण्या होणार आहेत व ही ट्रेन मरोळ-मरोशी मार्गावर बांधण्यात येणाऱ्या तात्पुरत्या सुविधा जागेवरच पार्क करण्यात येईल.

**प्र- रॅम्प विषयी अधिक माहिती?**

**उ-** रॅम्प ही भुयारी भागास भुपुष्ठभागावर जोडण्यासाठी करण्यात आलेली सुविधा आहे. सारिपुत नगर येथील रॅम्प २२५ मी लांब राहील.

**For further information please contact: -**


**Vaidehi More**

9028543087

vaidehi.more@mmrcl.com

**Niti Tamse**

8369727364/ 9664215544

niti.tamse@mmrcl.com